मुख्य प्रशासकीय अधिकारी, आयुष संचालनालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग गट-अ चाळणी परीक्षा - 2019
दि.- 20 जानेवारी, 2019

**A** → संच क्रमांक

**S12**

**प्रश्नपुस्तिका** — **प्रश्नपुस्तिका क्रमांक** BOOKLET NO.

**चाळणी परीक्षा/ SCREENING TEST**

**एकूण प्रश्न : 100**

वेळ : 1 (एक) तास — **सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी व प्रशासकीय कामकाज** — **एकूण गुण : 200**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | ↑ शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे भारतातील 'पहिले राज्य' हा मान कोणत्या संस्थानाने मिळविला ?

(1) बडोदा (2) औंध (3) कोल्हापूर (4) जुनागड

---

2. __________ हे 'J' या टोपण नावाने 'टाईम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्रात लेखन करीत.

(1) गणेश व्यंकटेश जोशी (2) वामन मल्हार जोशी

(3) गोपाळ कृष्ण जोशी (4) पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी

---

3. 'दक्षिणेतील बंड 1875' याविषयी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(अ) हे बंड गुजराती व मारवाडी सावकारांना पाठिंबा देण्यासाठी होते.

(ब) शिरुर तालुक्यातील करदे गावापासून संघर्षाला सुरुवात झाली.

(क) सरकारने दक्षिण बंड आयोग स्थापन केले.

(ड) बंड, जून 1875 पर्यंत संपूर्ण पुणे जिल्ह्यात पसरले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) फक्त (2) (अ), (ब), (क) फक्त

(3) (ब), (क), (ड) फक्त (4) (क), (ड) फक्त

---

4. 1912 साली झालेल्या 'महाराष्ट्र अस्पृश्य परिषदे'चे अध्यक्ष __________ होते.

(1) विठ्ठल रामजी शिंदे (2) रामकृष्ण भांडारकर

(3) नारायण चंदावरकर (4) बाबासाहेब आंबेडकर

---

5. सातपुडा पर्वताचा कांही भाग खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याच्या उत्तर भागात आढळतो ?

(1) बीड (2) उस्मानाबाद (3) अमरावती (4) जळगाव

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

6. जोड्या लावा :

| स्तंभ-I<br>( हिंस्त्र प्राणी/पक्षी योजना ) | स्तंभ-II<br>( जंगल प्रदेश ) |
|---|---|
| (अ) वाघ | (i) दाजीपूर |
| (ब) बायसन | (ii) कर्नाळा |
| (क) शेखरु | (iii) पेंच |
| (ड) पक्षी | (iv) भिमाशंकर |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

7. योग्य जोड्या जुळवा :

| गट-अ ( लेणी ) | गट-ब ( जिल्हा ) |
|---|---|
| (अ) अजिंठा | (i) रायगड |
| (ब) पांडव | (ii) पुणे |
| (क) धारापूरी | (iii) औरंगाबाद |
| (ड) कार्ले | (iv) नाशिक |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

8. जोड्या लावा :

| जलसिंचन योजना | | जिल्हा |
|---|---|---|
| (अ) कण्हेर | (i) | नाशिक |
| (ब) चाणकपूर | (ii) | नांदेड |
| (क) मन्याड | (iii) | सातारा |
| (ड) वाघुरे | (iv) | अहमदनगर |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

9. माहिती अधिकार कायद्याचे खालीलपैकी कोणते उद्दिष्ट **नाही** ?
(अ) सरकारी अधिकाऱ्यांना चुकीबद्दल शासन करणे.
(ब) भ्रष्टाचाराला आळा घालणे.
(क) राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविणे.
(ड) राज्य कारभारात पारदर्शकता आणणे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ)
(2) (अ) आणि (ब)
(3) (क)
(4) वरीलपैकी सर्व उद्दिष्टे आहेत.

10. माहिती अधिकार, 2005 च्या कलम 7 अन्वये जर मागितलेली माहिती एखाद्या व्यक्तिचे जीवित व स्वातंत्र्यासंबंधित असेल तर, विनंती अर्ज मिळाल्यापासून _________ आत ती देण्यात येईल.
(1) 12 दिवसांच्या
(2) 24 तासांच्या
(3) 46 तासांच्या
(4) वरीलपैकी काहीही नाही

11. माहिती अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 21 नुसार खालीलपैकी कोणती तरतूद केली आहे ?
(1) न्यायालयांच्या अधिकारितेत आडकाठी
(2) सद्‌भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण
(3) माहिती आयोगांचे अधिकार आणि कार्ये
(4) पदावधी व सेवेच्या शर्ती

12 माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये मुख्य माहिती आयुक्तास देय असलेले वेतन व भत्ते _________ यांच्या प्रमाणे असतील.
(1) निवडणूक आयुक्त
(2) राज्य शासनाच्या मुख्य सचिव
(3) लोकसभा अध्यक्ष
(4) राज्यसभा अध्यक्ष

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

13. भारत रत्न, पद्मश्री व पद्म विभूषण ही भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 18 खाली प्रतिबंधीत केलेली पदे नसून, सन्मानाची प्रमाणपत्रं आहेत, असा निर्णय भारतीय सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्यामध्ये दिला?

(1) बालाजी राघवन विरुद्ध भारत संघ (2) परीद लुभा विरुद्ध निलांबरन

(3) पश्चिम बंगाल विरुद्ध एस.के. घोष (4) के. सतवंत सिंग विरुद्ध पंजाब

---

14. जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या हक्कात (अनुच्छेद-21) __________ यांचा समावेश होतो.

(अ) कामाचा अधिकार

(ब) मानवी सन्मानाने जगण्याचा हक्क

(क) परदेशी प्रवास करण्याचा हक्क

(ड) सरकारी इस्पितळात वेळेवर वैद्यकीय उपचार मिळण्याचा हक्क

(इ) निवृत्तीवेतनाचा हक्क

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) (2) (ब), (क), (ड) (3) (क), (ड), (इ) (4) (अ), (ब), (इ)

---

15. खालीलपैकी कोणती संस्था ही घटनात्मक संस्था **नाही**?

(1) राज्य लोकसेवा आयोग (2) राज्य वित्त आयोग

(3) राष्ट्रीय विकास परिषद (4) अनुसूचित जातीसाठीचा राष्ट्रीय आयोग

---

16. भारतीय राज्यघटनेच्या 'मूलभूत चौकटीचे' (संरचनेचे) घटक कोणते आहेत?

(अ) राज्यघटनेची सर्वोच्चता

(ब) राज्यघटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप

(क) लोकसत्ताक व गणराज्यात्मक शासन प्रकार

(ड) राज्यघटनेचे संघराज्यात्मक स्वरूप

(इ) राष्ट्राची एकता आणि अखंडता

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) (2) (अ), (ब) आणि (ड)

(3) (ब), (ड) आणि (इ) (4) वरील सर्व

---

17. सामान्यतः सर्व सरकारी संस्था त्यांच्या वेबसाईटसाठी कोणत्या प्रकारचे डोमेन एक्स्टेंशन वापरतात?

(1) .कॉम (2) .इन (3) .ओआरजी (4) .गव्ह.इन

---

18. NNTP प्रोटोकॉलचा वापर करून जोडलेल्या नेटवर्क मधील सर्वर मुख्यत्वे खालीलपैकी कोणत्या कामासाठी वापरला जातो?

(1) शिक्षण संस्थातील अभ्यास संगणक जोडणे (2) बँकातील आर्थिक व्यवहार संगणक जोडणी

(3) न्यूज ग्रूप मधील संगणक जोडणी (4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

19. संगणकाच्या की बोर्ड मध्ये खालीलपैकी कोणत्या की चा समावेश असतो?

(1) अल्फान्युमरिक की (Alphanumeric Key) (2) स्पेशल की (Special Key)

(3) फन्क्शनल की (Functional Key) (4) वरीलपैकी सर्व

---

20. भारतातील सर्व नागरिकांना आणि सैन्यदलातील कर्मचाऱ्याना __________ या स्टँडर्ड वेब सिस्टीम द्वारे स्वत:वर होणाऱ्या अन्यायाबाबत दाद मागता येते.

(1) सी.पी.जी.आर.ए.एम.एस. (Centralized Public Grievance Redress and Monitoring System)

(2) इ-ग्रीव्हंस

(3) इ-ग्रीव्हंस रीअड्रेसल

(4) इ-रिपोर्ट

---

21. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना कोणत्या कायद्याच्या अनुषंगाने झालेली आहे?

(1) नॅशनल ह्यूमन राईट्स ॲक्ट, 1993 (2) प्रोटेक्शन ऑफ ह्यूमन राईट्स ॲक्ट, 1993

(3) कोव्हेनंट ऑन ह्यूमन राईट्स, 1994 (4) प्रिव्हेंशन ऑफ ह्यूमन राईट्स ॲक्ट, 1994

---

22. प्रत्येकाला जीवनाचा अधिकार, स्वातंत्र्य आणि व्यक्तीच्या सुरक्षिततेचा हक्क, सार्वभौम मानवी हक्काच्या घोषणापत्र (UDHR-1948) च्या कोणत्या अनुच्छेदा द्वारे प्रदान करण्यात आला आहे?

(1) अनुच्छेद 3 (2) अनुच्छेद 5 (3) अनुच्छेद 4 (4) अनुच्छेद 6

---

23. भारतातील पंचायती राज्यांवर पुढील समित्यांच्या स्थापनेची त्यांच्या स्थापन झालेल्या वर्षांच्या कालक्रमानुसार क्रमबद्ध करा.

(अ) अशोक मेहता समिती (ब) बलवंतराय मेहता समिती

(क) एल.एम. सिंघवी समिती (ड) जी.व्हि.के. राव समिती

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (क), (ड), (ब) (2) (ब), (अ), (ड), (क)

(3) (ब), (अ), (क), (ड) (4) (ड), (क), (ब), (अ)

---

24. मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993 अन्वये 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे कोणतेही पद रिक्त होते किंवा आयोगाची रचना सदोष होती याच केवळ कारणावरुन आयोगाने केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही यावर आक्षेप घेण्यात येणार नाही किंवा ती बेकायदेशीर ठरणार नाही.' या विधानाची सत्यता पडताळा.

(1) हे विधान सत्य आहे. (2) हे विधान असत्य आहे.

(3) हे विधान अंशत: सत्य आहे. (4) वरीलपैकी काहीही नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

25. जगातील सर्वात लांब समुद्र पूल कोणता ?

(1) हाँगकाँग – झुहाई पूल (2) डोंघाई पूल

(3) हँगझाँऊ बे पूल (4) बांद्रा-वरळी सी लिंक पूल

---

26. ऑस्कर 2019 साठी कोणता भारतीय सिनेमा Best Foreign Language Film Category मध्ये पाठविण्यात आला आहे ?

(1) राझी (Raazi) (2) गुलाबजाम (Gulabjaam)

(3) बायोस्कोपवाला (Bioscopewala) (4) व्हिलेज रॉकस्टार्स (Village Rockstars)

---

27. भारत व रशिया या देशांमधील संयुक्त सैन्य सरावाचे (Joint Military Exercise) नाव काय ?

(1) मैत्री (Maitree) (2) एक्सरसाइज इंद्रा (Exercise INDRA)

(3) अजेय वॉरियर्स (Ajaya Warriors) (4) करावली करूण्या (Karavali Karunya)

---

28. सध्या रूस्तम-2 (RUSTOM-2) चर्चेले जात होते. ते/ती काय आहे ?

(अ) संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने विकसित केलेले मानवरहित हवाई वाहन आहे.

(ब) ती आण्विक पाणबुडी आहे.

(क) ते हल्ला करणारे हेलिकॉपटर आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (ब) (3) (क) (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

29. जलसंवर्धनाबाबत विविध राज्ये आणि तिथे चालू असलेली योजना :

(अ) तेलंगना – काकतीया अभियान (ब) आंध्र प्रदेश – मुख्यमंत्री जल स्वावलंबन अभियान

(क) महाराष्ट्र – जलयुक्त शिवार अभियान (ड) राजस्थान – डेल्मा अभियान

वरीलपैकी कोणती/कोणत्या जोड्या/जोडी बरोबर **नाहीत** ?

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (क) (4) (ब) आणि (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

30. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) उत्तर प्रदेश राज्य शासनाने युनिसेफच्या सहकार्याने घरोघरी पोहचणारे 'दस्तक' (DASTAK) नामक अभियान सुरू केले आहे.

(ब) त्याचे उद्दिष्ट हे जपानी मेंदूज्वराचे (Japanise Encephalities) राज्यातून उच्चाटन करणे हा आहे.

(क) युनिसेफचे मुख्यालय जिनेव्हा आहे.

(ड) हेनरिएट्टा एच. फोर (Henrietta H. Fore) हे युनिसेफचे कार्यकारी संचालक आहेत.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

(1) (अ), (ब), (क) (2) (ब), (क), (ड) (3) (अ), (क), (ड) (4) (अ), (ब), (ड)

---

31. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) युनोस्कोने अहमदाबाद शहराला जागतिक वारसा शहर असा दर्जा प्रदान केला आहे.

(ब) दिल्ली नंतर अहमदाबाद हे दुसरे शहर आहे ज्याला जागतिक वारसा शहर असा दर्जा दिला आहे.

(क) अहमदाबाद शहर नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे.

वरीलपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त?

(1) फक्त (अ) (2) (अ) आणि (ब) (3) (ब) आणि (क) (4) (अ) आणि (क)

---

32. महाराष्ट्रात कर्जमाफी व इतर प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी 'शेतकरी कुटुंब' या संज्ञेत कोणाचा समावेश करण्यात आला?

(1) घरातील सर्व व्यक्ती (2) केवळ पती व पत्नी

(3) पती, पत्नी व अठरा वर्षाखालील मुले (4) पती, पत्नी व सर्व वयोगटातील मुले

---

33. जर सर्व माट हे मोट आहेत, सर्व मोट हे मेट आहेत व सर्व मेट हे मूट आहेत तर पुढीलपैकी खात्रीने सत्य नसलेले अनुमान निवडा.

(1) सर्व माट हे मेट आहेत. (2) सर्व मेट हे माट आहेत.

(3) सर्व माट हे मूट आहेत. (4) सर्व मोट हे मूट आहेत.

---

34. 3 हा अंक तीन वेळा व 5 हा अंक चार वेळा असतील अशा सात अंकी संख्या किती असतील?

(1) 7!/3! 5! (2) $3^3 \times 5^3$ (3) 77 (4) 35

---

35. एका शाळेत चार वर्ग आहेत. त्यात अनुक्रमे 10, 20, 30 व 40 विद्यार्थी आहेत. यातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी अनुक्रमे 20%, 30%, 60% व 100% आहे. तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची एकूण टक्केवारी किती?

(1) 56% (2) 34% (3) 76% (4) 66%

---

36. राजू 100 पायऱ्या चढून एका मंदिरात जातो. वर जाताना त्याने प्रत्येक पायरीवर तिच्या क्रमांकाएवढी फुले ठेवल्यास त्यास किती फुले बरोबर न्यावी लागतील?

(1) 4500 (2) 5000 (3) 5050 (4) 5500

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**पुढील उतारा वाचून त्यापुढील 37 व 38 या दोन प्रश्नांची उत्तरे द्या.**

जगातील महासागरांच्या पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनची पातळी झपाट्याने कमी होत आहे. माणसांप्रमाणेच जगण्यासाठी माशांनाही ऑक्सिजनची गरज असते. यामुळे महासागरांच्या ज्या क्षेत्रात ऑक्सिजन टंचाईची पातळी लक्षणीय असते त्या भागातील माशांचे प्रमाण वेगाने कमी होत जाते. या ऑक्सिजनच्या पातळीला हायपॉक्सिया म्हणून ओळखले जाते आणि त्यांना मृत टापू असेही म्हणतात. जरी काही हायपॉक्सी टापू निसर्गत: निर्माण होत असले तरी किनाऱ्या लगतच्या भागातील हायपॉक्सी टापू हे शेतीतून वाहून येणाऱ्या आणि औद्योगिक प्रक्रियेतून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामुळे तयार होतात. आज जगभर शंभराहून अधिक हजारो चौरस किलोमीटर क्षेत्रफळांचे कायम स्वरूपाचे मृत टप्पे अस्तित्वात आहेत.

कोणतीही प्रजाती चिरंजीवी ठरण्यासाठी तिच्या प्रजोत्पादनाचे यश हा कळीचा मुद्दा असतो. हायपॉक्सी टापूंच्या निर्मितीमुळे सागरी जीवांना तसेच जनुकीय वैविध्याला असलेल्या धोक्याबाबतची काळजी अनाठायी आहे असे म्हणता येणार नाही. मृत हायपॉक्सी टापूत अनेक महिने राहिल्यानंतर मासा-मादी कमी अंडी निर्माण करतात. गर्भावस्थेच्या पायरीला ज्या वेळी गर्भाचे लिंग निश्चित होते त्यावेळी दोन संजीवके निर्माण होतात. हायपॉक्सी परिस्थितीमुळे या दोन संजीवकांचे गुणोत्तर बदलते. गर्भ फलनाच्या वेळी हायपॉक्सी परिस्थितीत टेस्टोस्टेरॉन हे संजीवक जास्त प्रमाणात व एस्ट्रॉडिऑल कमी प्रमाणात निर्माण होते. टेस्टोस्टेरॉनच्या जास्त प्रमाणामुळे गर्भाचे स्त्री-प्रजोत्पादक अवयव व इतर स्त्री वैशिष्ट्ये विकसित न होता त्यात पुरुष गुणविशेषांची वाढ होते.

---

37. हा उतारा वर्तमानपत्रात वा एखाद्या नियतकालिकात प्रसिद्ध करताना त्याला देण्यासाठी पुढीलपैकी उचित शीर्षक निवडा.

(1) सावध व्हा (2) अनपेक्षित बदल

(3) बुचकळ्यात टाकणारी घटना (4) मासे खाणे टाळा

---

38. उताऱ्यातील माहितीत अंतर्निहित नसलेले निष्कर्ष निवडा.

(अ) मृत टापूतील मासे खाणे आरोग्याला घातक आहेत कारण त्यांच्या शरीरातील संजीवकांत बदल झाला आहे.

(ब) भविष्यात मृत टापूंची संख्या वाढू नये म्हणून औद्योगिक क्षेत्रातील सांडपाण्यावर योग्य त्या प्रक्रिया केली पाहिजे.

(क) मृत टापूमुळे मादी माशांच्या उत्पादनात होणाऱ्या घटीच्या परिणामी माशांच्या संख्येत घट होणार.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) आणि (क) (2) फक्त (क) (3) फक्त (अ) (4) कोणतेही नाही

---

39. एका सहशिक्षण वर्गात प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक इतर विद्यार्थ्याबरोबर बुद्धिबळ खेळावे अशी अपेक्षा आहे. झालेल्या एकूण सामन्यांपैकी 66 सामन्यात दोन्ही खेळाडू मुलगेच होते तर 36 सामन्यांत दोन्ही खेळाडू मुलीच होत्या. वर्गात खेळल्या गेलेल्या एकूण सामन्यांची संख्या निवडा.

(1) 108 (2) 189 (3) 210 (4) 102

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

40. प्लॅटफॉर्मवर अमितने सुनीताला सांगितले की तिथून लातूर 10 किमीपेक्षा जास्त अंतरावर आहे. सुनीताला माहिती होते की लातूर हे तिथून बारा किमीपेक्षा जास्त आणि चौदा किमीपेक्षा कमी अंतरावर आहे. जर त्या दोघांचेही म्हणणे बरोबर असेल तर लातूर तिथून किती अंतरावर आहे?

(1) 11 किमी (2) 12 किमी (3) 13 किमी (4) 14 किमी

41. एखाद्या क्षेत्रातील खर्चिक राहणीमान किंवा रोगट परिस्थिती लक्षात घेऊन त्या क्षेत्रातील मुख्यालयात कार्यरत शासकीय कर्मचाऱ्यास कोणता भत्ता अनुज्ञेय असतो?

(1) विशेष भत्ता (2) धुलाई भत्ता (3) प्रवास भत्ता (4) स्थानिक भत्ता

42. कमी वेतन असलेल्या पदावरील बदली केव्हा अनुज्ञेय असते?

(अ) अकार्यक्षमता किंवा गैरवर्तणूक

(ब) त्याने केलेली लेखी विनंती

(क) त्याचा ज्या पदावर धारणाधिकार आहे, ते पद नष्ट होण्याची शक्यता

(ड) तो सध्या जे काम करतो, त्यापेक्षा कमी कष्टाचेच काम करण्यास तो योग्य असल्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर (2) (अ), (ब) व (क) बरोबर

(3) (ब), (क) व (ड) बरोबर (4) (अ), (ब), (क) व (ड) बरोबर

43. पुढील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.

(अ) शिकाऊ उमेदवार म्हणून केलेली सेवा निवृत्ती वेतनासाठी अर्हताकारी ठरत नाही.

(ब) शासकीय मुद्रणालयात शिकाऊ उमेदवार म्हणून केलेली सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात येते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (अ) बरोबर व (ब) चूक (2) वरील (ब) बरोबर व (अ) चूक

(3) वरील (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) वरील (अ) व (ब) दोन्ही चूक

44. कर्तव्यांमध्ये पुढील बाबी समाविष्ट असतील -

(अ) परिवीक्षाधीन म्हणून केलेली सेवा

(ब) पदग्रहण अवधी

(क) शासनाच्या आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला प्रशिक्षणाचा कालावधी

(ड) प्रशिक्षणाच्या कालावधीनंतर एक किंवा अधिक दिवस सुट्ट्या जोडून आल्यास तेवढ्या दिवसांचा प्रशिक्षण कालावधी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर (2) (ब) व (क) बरोबर

(3) (अ), (ब) व (क) बरोबर (4) (अ), (ब), (क) व (ड) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

45. श्री. दळवी, लिपिक टंकलेखक यांनी रजेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज सादर केला. सक्षम प्राधिकाऱ्यांनी कोणती गोष्ट तपासणे गैर लागू आहे?

(1) श्री. दळवी यांच्या रजा कालावधीत कार्यालयीन काम सुरळीत चालू शकते किंवा नाही

(2) श्री. दळवी यांना माघील रजेवरून सक्तीने परत बोलविण्यात आले होते किंवा कसे

(3) श्री. दळवी यांनी पूर्वीच्या रजेवरून परत आल्यानंतर किती व कोणत्या स्वरूपाची सेवा बजावली

(4) श्री. दळवी यांच्या रजेचे नेमके प्रयोजन काय

---

46. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भातील शासकीय अधिसूचना दि. 8 फेब्रुवारी, 2007 अन्वये शासकीय कर्मचारी शासनाच्या पूर्व-मंजूरी शिवाय कोणत्या निधी उभारणीच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होऊ शकेल?

(1) शिक्षक दिन निधी (2) बालकल्याण निधी

(3) महिला सशक्तीकरण निधी (4) ध्वज दिन निधी

---

47. वेतनवाढ रोखून ठेवण्याचे आदेश देताना ती रोखून ठेवणारा प्राधिकारी पुढील गोष्टी नमूद करेल.

(अ) वेतनवाढ रोखून ठेवल्याचा कालावधी

(ब) वेतनवाढ स्थगित केल्याचा परिणाम म्हणून आगामी वेतनवाढ लांबणीवर पडतील किंवा नाही

(क) ज्या कालावधीकरिता वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल तो कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, मध्यंतरी घेतलेल्या कोणत्याही रजेचा काळ वगळला जाईल किंवा नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) फक्त (2) (अ) व (ब)

(3) (अ) व (क) (4) (अ), (ब) व (क)

---

48. एका शासकीय अधिकाऱ्यास त्यांची मंजूर रजा संपण्यापूर्वीच बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला व त्या आदेशामध्ये कामावर परत येणे वैकल्पिक असल्याचे नमूद करण्यात आले.

विधानास कोणता पर्याय **योग्य** आहे?

(1) कार्यालयाने काढलेले आदेश योग्य आहेत.

(2) रजेवरून परत बोलवावयाचे असल्यास विकल्प देता येत नाही.

(3) रजा मंजूर असल्यास असे आदेश काढता येत नाही.

(4) कार्यालयाने काढलेले आदेश चुकीचे आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

49. पदग्रहण अवधीतील वेतन केंव्हा अनुज्ञेय होते ?

(अ) पदग्रहण अवधी मंजूर केला असेल तेव्हा,

(ब) जेव्हा त्याला नवीन पदावरील नियुक्तीची पुरेशी नोटीस मिळालेली नसेल तेव्हा,

(क) शासकीय कर्मचारी कोणत्याही शासनाच्या नियंत्रणाखालील स्थायी पद कायम या नात्याने धारण करीत नसताना,

(ड) स्पर्धा परीक्षेच्या निकालानूसार त्याची नवीन पदावर नियुक्ती केली जाते तेव्हा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर
(2) (अ) व (ब) बरोबर
(3) (अ), (ब) व (क) बरोबर
(4) (अ), (ब), (क) व (ड) बरोबर

---

50. शासकीय कर्मचाऱ्याने त्याची कोणत्याही सेवेत किंवा पदावर प्रथम नियुक्ती झाल्यानंतर मत्ता व दायित्वा संबंधात कोणती विवरणे सादर करणे आवश्यक आहे ?

(अ) स्वत:च्या मालकीची किंवा वारस म्हणून प्राप्त झालेली स्थावर मालमत्ता

(ब) स्वत:च्या मालकीची किंवा वारस म्हणून प्राप्त झालेली जंगम मालमत्ता

(क) बँक ठेवी सहीत, शेअर्स, ऋणपत्रे आणि रोख रक्कम

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) (अ) व (ब)
(4) वरील सर्व

---

51. स्वीयेत्तर सेवेतील बदली केंव्हा अनुज्ञेय नसते ?

(अ) बदली झाल्यानंतर पार पाडावयाची कर्तव्ये ही, सार्वजनिक कारणास्तव एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने पार पाडली पाहीजेत अशा स्वरूपाची असतील.

(ब) बदली होणारा स्थायी किंवा अस्थायी शासकीय कर्मचारी, बदलीच्या वेळी राज्याच्या एकत्रित निधीतून वेतन दिले जाणारे पद धारण करीत असेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्हीही विधान चुकीची आहेत
(2) दोन्हीही विधान बरोबर आहेत
(3) फक्त (अ) बरोबर आहे
(4) फक्त (ब) बरोबर आहे

---

52. दि. _________ च्या शासन निर्णयान्वये, दि. 1.11.2005 रोजी किंवा त्यानंतर प्रथमच शासकीय सेवेत हजर होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली.

(1) 15.10.2005
(2) 31.10.2005
(3) 1.11.2005
(4) 15.1.2005

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

53. पुढील विधानास कोणता पर्याय **बरोबर** आहे?

शासकीय कर्मचाऱ्याचा एकाच वेळी अधिक पदावर धारणाधिकार असण्यावर कोणते निर्बंध आहेत?

(अ) दोन किंवा त्याहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांची एकाच स्थायी पदावर एकाच वेळी कायम नियुक्ती करता येत नाही.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याची एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक स्वतंत्र व स्थायी पदावर कायम नियुक्ती करता येत नाही.

(क) ज्या पदावर दुसऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचा धारणाधिकार आहे अशा पदावर शासकीय कर्मचाऱ्याची कायम नियुक्ती करता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ) व (ब)

(3) फक्त (ब) व (क) (4) वरील सर्व

54. शासकीय कर्मचाऱ्यास विवाह विषयक कोणते बंधन पाळणे आवश्यक **नाही**?

(1) शासकीय कर्मचाऱ्याचा जीवनसाथी हयात असताना अन्य व्यक्तीशी विवाह

(2) ज्याचा जीवनसाथी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह

(3) जीवनसाथी शासकीय कर्मचारी असल्यास शासनाची पूर्व परवानगी

(4) परदेशी नागरिक असल्यास शासनास कळविणे

55. बदली या व्याख्येत पुढीलपैकी कोणत्या विधानाचा अंतर्भाव आहे?

(अ) नवीन पदाची कर्तव्ये सांभाळणे

(ब) मुख्यालयात झालेला बदल

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) व (ब) (4) यापैकी नाही

56. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम कोणत्या दिनांकापासून अंमलात आले आहेत?

(1) 12 जुलै 1997 (2) 21 जुलै 1979 (3) 12 जुलै 1979 (4) 21 जुलै 1981

57. पुढीलपैकी कोणती रजा विशेष प्रकारच्या रजेत मोडत **नाही**?

(1) प्रसूती रजा (2) असाधारण रजा

(3) रुग्णालयीन रजा (4) अपघाती रजेमुळे विशेष विकलांगता रजा

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

58. नियत वयोमान निवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याची निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे, सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी जास्तीत जास्त _________ आत लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावीत.

(1) 1 वर्ष (2) 8 महिने (3) 6 महिने (4) 3 महिने

59. खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन देण्यात येईल?

(अ) शासकीय कर्मचाऱ्याला शारीरिक किंवा मानसिक विकलांगता आल्यास.

(ब) शासकीय सेवेकरिता किंवा शासकीय सेवेत ज्या विशिष्ट शाखेत तो काम करीत आहे, तेथील कामाकरिता तो *असमर्थ असल्यास.*

(क) शासकीय सेवेकरिता असमर्थ असल्यासंबंधिचा वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यास.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (क) बरोबर (2) फक्त (ब) व (क) बरोबर

(3) फक्त (अ) व (ब) बरोबर (4) (अ), (ब) व (क) बरोबर

60. शासकीय कर्मचाऱ्याची स्वीयेत्तर सेवेमधील बदली किंवा स्वीयेत्तर सेवेमधील मुदतवाढ मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याने अशा मंजूरी आदेशाची प्रत यांना पाठवलीच पाहिजे.

(अ) लेखा परीक्षा अधिकारी (ब) शासकीय कर्मचारी

(क) रोखपाल (ड) लेखापाल

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (अ) व (ब)

(3) (अ), (ब) व (क) (4) (अ), (ब), (क) व (ड)

61. कोणत्या प्रकारची रजा इतर रजेला जोडून घेता येत **नाही**?

(1) अर्जित रजा (2) अर्धवेतनी रजा (3) बदली रजा (4) नैमितिक रजा

62. श्री. देसाई हे क्रिडा विभागात कार्यरत आहेत त्यांनी 'देसाई कबड्डी करंडक स्पर्धा' त्यांच्या गांवात आयोजित करण्याचे ठरविले. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार पुढील कोणता पर्याय **योग्य** आहे?

(1) यासाठी शासनाची पूर्व मान्यता आवश्यक आहे

(2) ते स्वत: क्रिडा विभागात कार्यरत असल्याने शासनाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता नाही

(3) देशी खेळास उत्तेजन देत असल्याने ते अशी स्पर्धा शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय घेवू शकतात

(4) स्पर्धा समाप्त झाल्यानंतर शासनास रितसर अहवाल सादर केला पाहिजे

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

63. खालीलपैकी जबर शिक्षा कोणती आहे?

(अ) सेवेतून काढून टाकणे
(ब) पदोन्नती रोखून ठेवणे
(क) सक्तीची सेवानिवृत्ती
(ड) वेतनवाढ रोखून ठेवणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ड)
(2) (अ) व (क)
(3) (अ), (क) व (ड)
(4) (अ) व (ब)

---

64. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 नुसार कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याच्या संबंधात शासन किंवा ज्यास या नियमांद्वारे किंवा त्यान्वये अधिकार प्रत्यायोजित केले असेल त्यास काय संबोधतात?

(1) नियंत्रक अधिकारी
(2) सक्षम प्राधिकारी
(3) विशेष अधिकारी
(4) कार्यासन अधिकारी

---

65. शासकीय कर्मचाऱ्यास रजा नामंजूर करण्यासाठी पुढीलपैकी विवक्षित परिस्थिती कोणती?

(1) बडतर्फी अथवा सक्तीने सेवानिवृत्ती
(2) एका विभागातून अन्य विभागात झालेली बदली
(3) रजा कॅलेंडर वर्षाच्या सुरुवातीपासून चालू होत असल्यास
(4) दोन प्रकारच्या रजा जोडून घेतल्या असल्यास

---

66. निलंबित शासकीय कर्मचाऱ्यास देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्यातून खालीलपैकी कोणकोणत्या रकमा सक्तीने वसूल करण्यात याव्यात?

(अ) आयकर व व्यवसायकर
(ब) भविष्य निर्वाह निधीतून घेतलेल्या अग्रिमाचे हप्ते
(क) शासनाकडून घेतलेली कर्जे व अग्रिमे
(ड) सहकारी भांडारे व पतसंस्था यांना देय असलेल्या रकमा

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी (अ) व (ब)
(2) वरीलपैकी (अ) व (क)
(3) वरीलपैकी (ब) व (क)
(4) वरील सर्व पर्याय बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

67. म.ना.से. (वर्तणूक) नियमानुसार खालीलपैकी **योग्य** पर्याय निवडा.

(अ) शासकीय कर्मचाऱ्याला अशोभनीय ठरेल अशी कोणतीही गोष्ट करता येत नाही.

(ब) शासनाच्या पूर्वमान्यता खेरीज शासकीय कर्मचारी (गट 'अ' व गट 'ब') आपल्या मुलाला किंवा मुलीला, शासनाशी कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या कंपनीत नोकरी करण्यास परवानगी देऊ शकतो.

(क) परंतु अशी नियुक्ती मिळविण्याकरिता त्याचा पदाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापर करता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ) बरोबर (2) (अ) व (ब) बरोबर

(3) (अ) व (क) बरोबर (4) सर्व बरोबर

---

68. श्री. पाटील, अवर सचिव यांनी "अंधश्रद्धा नव्हे वैधानिक सत्य" परिसंवादामध्ये भाग घेतला. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार श्री. पाटील यांनी काय खबरदारी घेणे गरजेचे होते ?

(1) त्यांनी कार्यक्रमात उपस्थित होण्यापूर्वी शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते.

(2) त्यांनी कार्यक्रम पार पाडल्यानंतर शासनास ही बाब कळविली पाहिजे.

(3) त्यांच्या सहभागाविषयी शासनास कळविणे गरजेचे नाही.

(4) शासकीय कर्मचारी असल्याने अशा परिसंवादामध्ये भाग घेणे टाळले पाहिजे.

---

69. पदग्रहण अवधीची गणना करताना त्यामध्ये प्रवासाचे दिवस मोजताना, खालीलपैकी योग्य पर्याय निवडा :

(1) रविवार हा दिवस धरला जात नाही पण त्यात सार्वजनिक सुट्टी धरली जाते.

(2) रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस धरले जात नाहीत.

(3) रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस धरले जातात.

(4) रविवारचा दिवस धरला जातो पण सार्वजनिक सुट्टीचा दिवस धरला जात नाही.

---

70. शासकीय कर्मचाऱ्यास खालीलपैकी कोणत्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येते ?

(अ) नियम 4 अन्वये काढलेला निलंबन आदेश

(ब) नियम 5 मधील नमूद शिक्षा बाबतचा शिक्षा आदेश

(क) नियम 8 खालील चौकशीच्या ओघात चौकशी प्राधिकरणाने काढलेला कोणताही आदेश

(ड) राज्यपालांनी काढलेला कोणताही आदेश

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (क) (2) (ब) व (क) (3) (अ) व (ब) (4) उपरोक्त पैकी सर्व

---

71. परिवर्तीत रजा म्हणजे काय ?

(1) देय अर्धवेतनी रजेच्या दुप्पट कालावधी (2) देय अर्धवेतनी रजेच्या निम्मा कालावधी

(3) देय अर्धवेतनी रजे इतका कालावधी (4) अर्धवेतनी रजेशी संबंधित नाही

---

72. भारताचा किंवा राज्याचा एकत्रित निधी म्हणजे :

(1) केंद्र सरकारला प्राप्त झालेला महसूली निधी

(2) राजकोष पत्रांच्या विक्रीद्वारे उभारलेली रक्कम

(3) कर्जे किंवा अर्थोपाय आगाऊ रकमा आणि कर्जाच्या परतफेडीच्या रूपाने शासनाकडे जमा झालेला सर्व पैसा

(4) वरील सर्व

---

73. प्रत्येक विभाग प्रमुख दर ________ म्हणजेच ________, त्या तारखेपासून पुढील 24 ते 30 महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करून घेईल.

(1) वर्षी, 1 एप्रिलला (2) वर्षी, 1 जानेवारीला

(3) सहा महिन्यांनी, 1 जानेवारी व 1 जुलैला (4) सहा महिन्यांनी, 1 एप्रिल व 1 ऑक्टोबरला

---

74. स्वीयेत्तर सेवेतील शासकीय कर्मचाऱ्याला :

(अ) भारताच्या किंवा राज्याच्या किंवा संघराज्याच्या एकत्रित निधीतून वेतन मिळते.

(ब) भारताच्या किंवा राज्याच्या किंवा संघराज्याच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त कोणत्याही उत्पन्नाच्या साधनातून वेतन मिळते.

(क) शासनाच्या मंजूरीने वेतन मिळते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर (2) (अ) व (क) बरोबर

(3) (ब) व (क) बरोबर (4) केवळ (अ) बरोबर

---

75. खालीलपैकी **अचूक** पर्याय कोणता आहे?

(अ) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 309 च्या परंतुकाद्वारे प्राप्त अधिकारानुसार म.ना.से. नियम करण्यात आले आहेत.

(ब) म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, 1979 हे सन 1981 पासून अंमलात आले आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ) बरोबर (2) केवळ (ब) बरोबर

(3) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

76. शासकीय कर्मचाऱ्याच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीतील खालीलपैकी कोणत्या रजा निवृत्ती वेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून हिशेबात घेतल्या जातात ?

(अ) अर्जित रजा (ब) अर्धवेतनी रजा (क) असाधारण रजा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) (2) (ब) व (क)

(3) केवळ (अ) (4) (अ), (ब) व (क)

---

77. निवडसूचीतून पदोन्नती मिळालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याची आपसातील सेवाज्येष्ठता कशी राहील ?

(1) निवडसूचीत ज्या क्रमाने त्यांची नांवे असतील त्याच क्रमाने

(2) निवडसूची दोन भागात असेल तर पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्यांची नांवे तर दुसऱ्या भागात निवड झालेल्यांची नांवे असतील तर पहिल्या भागातील सर्व व्यक्तींचा क्रम दुसऱ्या भागातील समाविष्ट व्यक्तींच्या वर लागेल

(3) (1) व (2) दोन्ही

(4) यापैकी नाही

---

78. कोणत्याही प्रकरणाशी संबंधित अभिलेख, पूर्वोदाहरणे, नियम, विनियम, पुस्तके किंवा इतर संबंधित कागदपत्रे प्रस्तुत करण्याच्या व तसा निर्देश करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(1) बंद (टॅग) लावणे (2) संदर्भ देणे (3) कागदपत्र देणे (4) स्मरणपत्र देणे

---

79. मंत्रालय अभिलेख कार्यालयातून प्राप्त केलेली फाईल किती कालावधीपेक्षा अधिक काळ ठेवून घेण्यात येऊ नये ?

(1) एक महिना (2) दोन महिने (3) 75 दिवस (4) तीन महिने

---

80. फाईल याचा अर्थ विशिष्ट स्वतंत्र क्रमांक देण्यात आलेल्या एखाद्या विनिर्दिष्ट विषयाशी संबंधित असलेल्या कागदपत्रांचा संच असा असून त्यात खालील नमूद कोणत्या भागाचा समावेश होतो ?

(अ) पत्रव्यवहार (ब) टिप्पण्या

(क) पत्रव्यवहाराचे परिशिष्ट (ड) टिप्पण्यांचे परिशिष्ट

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) (2) (अ), (ब) व (क) (3) वरील सर्व (4) यापैकी नाही

---

81. महाराष्ट्र शासन कार्यनियमावली नियमांमधील कोणत्या नियमान्वये राज्य शासनाने किंवा राज्य शासनातर्फे दिलेले आदेश किंवा निष्पादीत केलेले सर्व लेख हे राज्यपालांच्या नांवाने किंवा त्यांच्या आदेशावरून दिल्याचे किंवा निष्पादीत केल्याचे समजण्यात येईल ?

(1) 11 (2) 12 (3) 13 (4) 14

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

82. खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्याविरुद्ध कोणतीही शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव शासन कार्यनियमावलीच्या नियम 15 अन्वये मुख्यमंत्र्याना सादर करावीत अशी तरतूद आहे?

(अ) अखिल भारतीय सेवांचे अधिकारी

(ब) विभागाच्या विभागप्रमुख किंवा प्रदेश प्रमुख यांच्या दर्जाचे व त्या दर्जावरचे अधिकारी

(क) विविध महामंडळाचे व्यवस्थापन संचालक

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व
(2) फक्त (अ) व (क)
(3) फक्त (अ) व (ब)
(4) वरीलपैकी एकही नाही

---

83. अंतिम निर्णय घेण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेल्या अधिकाराची यादी केव्हा व कोणत्या तारखेस अद्ययावत करण्यात येईल?

(1) प्रत्येक दोन वर्षांनी, 1 जानेवारीस
(2) प्रत्येक अनुवर्ती वर्षी, 2 मे स
(3) ज्यावेळेस गरज भासेल
(4) वरीलपैकी कधीही नाही

---

84. 'अ' आणि 'ब' वर्गामध्ये वर्गीकरण केलेल्या फाईलींचे किती वर्षांनी पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे?

(1) दर पाच वर्षांनी
(2) दर दहा वर्षांनी
(3) दर तीन वर्षांनी
(4) पुनर्विलोकनाची आवश्यकता नाही

---

85. राज्यपाल यांच्या सचिवांच्या कार्यालयाकडे पाठवावयाचे संदर्भ कोणत्या अधिकाऱ्याने स्वाक्षरीत करायची असतात?

(अ) कार्यासन अधिकारी (ब) अवर सचिव (क) उपसचिव (ड) सचिव

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब)
(2) (ब) व (क)
(3) (ब), (क) व (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड)

---

86. फौजदारी दंड संहिता, 1973 च्या कलम 173 अंतर्गत दाखल प्रकरणी तपास अधिकारी/यंत्रणेने कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक असल्याचे उच्च न्यायालयाने नमूद केले आहे?

(अ) पुरावा दर्शविणारे साहित्य
(ब) पोस्ट मार्टम रिपोर्ट
(क) वैद्यकीय तपासणी बाबतची कागदपत्रे
(ड) तज्ञांचे रिपोर्ट

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब)
(2) फक्त (अ), (ब) व (क)
(3) वरील सर्व
(4) फक्त (ड) वगळून

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

87. सेवा कालावधीची गणना करतेवेळी खालील कालावधी वगळावा लागेल :

(अ) पदोन्नतीनंतरचा कालावधी

(ब) अभावित नेमणूक म्हणून केलेला कालावधी

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील दोन्ही (2) फक्त (अ) (3) फक्त (ब) (4) यापैकी नाही

---

88. ठरावी आकस्मिक खर्चाचे अंदाज तयार करताना खालीलपैकी कोणत्या तत्वांचे पालन करण्यात यावे ?

(अ) सदरचे अंदाज हे ठरावी अनुदानासाठी मंजूर केलेल्या रकमेवर आधारलेले पाहिजेत.

(ब) मंजूर रकमेतून एखाद्या वर्षी बचत उपलब्ध होत असेल तर बचत रक्कम जेव्हा आवश्यक असेल तेव्हा ठरावाच्या कालावधीत उपलब्ध करून दिली जावी.

(क) संवितरण अधिकाऱ्याला नेमून दिलेल्या ठरावी आकस्मिक खर्चाच्या रकमेपेक्षा कोणत्याही वर्षात अधिक खर्च करण्यात आला असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्याची ठरावी आकस्मिक खर्चासाठी असलेल्या अनुदानाची रक्कम पुढील वर्षासाठी तेवढ्या रकमेने कमी करावी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व बरोबर (2) सर्व चूक

(3) फक्त (अ) व (ब) बरोबर (4) फक्त (ब) व (क) बरोबर

---

89. न्यायालयीन प्रकरणी/अर्धन्यायिक प्रकरणी झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी कधी करावी ?

(अ) संबंधित आदेशाला वरिष्ठ न्यायालयाने स्थगिती दिली असेल

(ब) संबंधित आदेशाला वरिष्ठ न्यायालयाने रद्द केले नसेल

(क) संबंधित आदेशात वरिष्ठ न्यायालयाने वा संबंधित न्यायालयाने दुरुस्ती केली नसेल

(ड) अन्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क) (2) (ब) व (क)

(3) वरील सर्व (4) यापैकी नाही

---

90. कोणाच्या आदेशाशिवाय कोणतीही गोपनीय किंवा गुप्त फाईल दुसऱ्या विभागाकडे अधिकृत किंवा अनौपचारिकरित्या पाठविण्यात येणार **नाही** ?

(1) उपसचिव (2) सहसचिव (3) अवरसचिव (4) सचिव

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

91. राज्याचे मुख्यमंत्री कोणत्या परिस्थितीत आपली सर्व कामे किंवा कोणतीही कामे पार पाडण्यास निर्देश देतील?

(अ) अनुपस्थिती

(ब) आजारपण

(क) इतर कोणत्याही कारणांमुळे आपली कामे पार पाडणे शक्य नसेल

(ड) अन्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (अ) व (क)

(3) फक्त (अ), (ब) व (क) (4) वरील सर्व

---

92. एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे एखादा विषय हस्तांतर करण्याच्याबाबतीत संबंधित विषय कधीपर्यंत हाताळणे चालू ठेवील?

(1) हस्तांतरणासाठी अन्य विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यास

(2) हस्तांतरण करण्याच्या प्रश्नावर निर्णय घेतला जात नाही

(3) संबंधित अन्य विभागाने किंवा अन्य कार्यासनाने हस्तांतरणास मान्यता/सहमती दर्शविली नाही

(4) वरीलपैकी एकही नाही

---

93. न्यायिक व अर्धन्यायिक न्यायालयीन प्रकरणी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी त्यांना सरकारी अभियोक्ता, मा. उच्च न्यायालय यांच्या कार्यालयाकडून सूचना/विनंती प्राप्त झाल्यानंतर किती दिवसात माहिती पुरविणे अपेक्षित आहे?

(1) तात्काळ (2) एक महिन्यात (3) सात दिवसात (4) यापैकी नाही

---

94. सहा वर्षा पेक्षा जास्त काळ प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित राहिलेल्या/थकीत ठेवलेल्या परंतु मुदतीबाबतच्या कालबाह्य न झालेले शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते किंवा वाढीबाबतचे दावे मंजूर करण्याचे अधिकार व वित्तीय मर्यादा यांच्या कोणत्या जोड्या बरोबर आहेत?

(अ) कार्यालय प्रमुख – प्रत्येक प्रकरणी रु. 40 हजार

(ब) प्रादेशिक कार्यालय प्रमुख – प्रत्येक प्रकरणी रु. 60 हजार

(क) विभाग प्रमुख – प्रत्येक प्रकरणी रु. 1 लक्ष

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) (अ) व (ब) बरोबर

(3) फक्त (ब) बरोबर (4) सर्व बरोबर

---

95. जेव्हा शासनाची औपचारिक मंजूरी समान किंवा कनिष्ठ दर्जाच्या शासकीय अधिकाऱ्यास कळवायची असते तेव्हा __________ या नमुन्याचा वापर करतात.

(1) ज्ञापन (2) परिपत्रक (3) अधिसूचना (4) कार्यालयीन आदेश

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

96. एखादे न्यायालयीन प्रकरण कोणत्या विभागाने हाताळावे याबाबत सरकारी अभियोक्ता/अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निर्णयाप्रत येण्यापूर्वी कोणती कार्यवाही करावी ?
   (1) सर्वसाधारण कार्य नियमावली, महाराष्ट्र शासन यानुसार मार्गदर्शन घ्यावे
   (2) प्रथम दर्शनी दिसून येत असलेल्या मुद्यांच्या आधारे संबंधित विभागाच्या सचिवांशी संपर्क करणे
   (3) वरील दोन्ही
   (4) वरीलपैकी एकही नाही

97. बिनसरकारी व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून आलेल्या पत्रांना किती दिवसात पोच द्यावी ?
   (1) 30 दिवस (2) 7 दिवस (3) ताबडतोब (4) 2 दिवस

98. सेवाज्येष्ठता निश्चित करतेवेळी कोणकोणता कालावधी सेवा कालावधी म्हणून गणला जाईल?
   (अ) अभावित नेमणूकीने केलेली सेवा कालावधी.
   (ब) प्रतिनियुक्तीच्या पदावर केलेली प्रमाणित सेवा कालावधी.
   (क) रजा कालावधी हा सेवा कालावधी म्हणून प्रमाणित केल्यास.
   (ड) अनुपस्थितीचा प्रमाणित न केलेला सेवा कालावधी.
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (ब) व (क) बरोबर (2) फक्त (अ) बरोबर
   (3) फक्त (अ), (ब) व (क) बरोबर (4) सर्व बरोबर

99. महालेखापाल व वित्त विभागाने राज्याच्या विनियोजन लेख्याबाबत सादर केलेल्या अहवालाचे परिनिरीक्षण करण्याचे काम विधानमंडळाची "_________" समिती करते.
   (1) व्यय अग्रक्रम (2) लोकलेखा (3) अंदाज (4) स्थायी

100. पुनर्विनियोजने केव्हा शक्य नसतात ?
   (अ) भारीत बाबीतून दत्तमत बाबीकडे पुनर्विनियोजन.
   (ब) दत्तमत बाबीतून भारीत बाबीकडे पुनर्विनियोजन.
   (क) राज्यपालांच्या विशेष जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राज्यपालांच्या निदेशानुसार आवश्यक म्हणून विनियोजन अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचित समाविष्ट रकमांमधून किंवा त्या रकमांमध्ये विभागाकडून राज्यपालांच्या विनिर्दिष्ट मंजूरीशिवाय.
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर
   (3) फक्त (अ) व (ब) बरोबर (4) (अ), (ब) व (क) बरोबर

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**सूचना** — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

**Pick** out the correct word to fill in the blank :

**प्रश्न क्र.** 201. I congratulate you __________ your grand success.

(1) for (2) at

(3) on (4) about

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" हे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता *फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.***

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK